# 800 नागरिक आज बोधगयाला होणार रवाना

## मुख्यमंत्री, पालकमंत्री दाखवणार हिरवी झेंडी

### सामाजिक न्याय विभागाचा उपक्रम

नागपूर, सिटी रिपोर्टर. महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेंतर्गत सामाजिक न्याय विभागाच्या वतीने नागपूर येथून महाबोधी विहार, बोधगया येथे 800 ज्येष्ठ नागरिक 5 फेब्रुवारी रोजी दुपारी 2.15 वाजता नागपूर येथील मुख्य रेल्वे स्टेशन येथून ही रेल्वे रवाना होतील. याचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याप्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती समाजकल्याण विभागाच्या सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी दिली आहे. भगवान बुद्ध यांनी इसवी सन पूर्व 521 मध्ये बोधगया येथे बोधी वृक्षाच्या खाली बसून संपूर्ण अंतरज्ञान प्राप्त केले. सम्राट अशोक यांनी या ठिकाणी तीर्थयात्रेला आल्यानंतर मंदिराचे निर्माण केले. या पवित्र भूमीच्या तीर्थयात्रेसाठी भाविकांची ओढ असते. विशेषतः वयोवृध्द ज्येष्ठ नागरिक बोधगया दर्शनाचे स्वप्न म्हणून ते जपून असतात. 60 वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना तीर्थयात्रेचा लाभ घेता यावा, यासाठी शासनाने मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना जाहीर केली आहे. या योजनेंतर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत नागपूर येथून सुमारे 800 लाभार्थी बोधगया तीर्थयात्रेत सहभागी होत आहेत.